# वित्त विभाग
# जिल्हा परिषद धाराशिव

दुरध्वनी- (02472) 299122 इमेल: cafozpdharashiv@gmail.com


जा.क्र.जिपउ/वित्त/आस्था-1/५७५/2025 दिनांक :- ११ .07.2025

प्रति,

.................................................

.................................................

.................................................

**विषय :- जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत गट-क संवर्गातील सरळसेवा पदभरती-2023 कागदपत्र पडताळणीकरीता दि.15/07/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता उपस्थित राहणे बाबत...**

**संदर्भ :** १) जिल्हा परिषद धाराशिव यांचेकडील सरळसेवा पदभरती सन 2023 साठीची जाहिरात क्र.1/2023 दि.05/08/2023

२) वरिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदासाठी IBPS मुंबई यांचेकडील Online परिक्षेतील प्राप्त निकाल

3.मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष ,जिल्हा निवड समिती यांची मान्य टिपणी दि.08.07.2025

उपरोक्त विषयी जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत गट-क संवर्गातील सरळसेवा पदभरती-2023 साठी जाहिरात क्र.1/2023 दि.05 ऑगष्ट, 2023 च्या अनुषंगाने IBPS कंपनी मार्फत घेण्यात आलेल्या **वरिष्ठ सहाय्यक (लेखा)** या पदाच्या Online परिक्षेमधील प्राप्त निकालानुसार भ.ज.(क) प्रवर्गातील रिक्त पदाच्या अतिरीक्त निवडसुचीसाठी पात्र गुणवत्ताधारक उमेदवारांची यादी या जिल्हा परिषदेच्या www.zpdharshiv.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर दि.11.07.2025 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**वरिष्ठ सहाय्यक (लेखा)** संवर्गातील भरावयाच्या भ.ज.(क) प्रवर्गातील रिक्त पदासाठी कागदपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुळ शैक्षणिक व इतर आवश्यक सर्व अभिलेखे तसेच जाहिरातीमधील नमूद आवश्यक कागदपत्राची पडताळणी **दि.15.07.2025 रोजी सकाळी 11.00 वाजता स्थायी समिती सभागृह, जिल्हा परिषद धाराशिव** येथे करण्यात येणार आहे.

सबब याद्वारे आपणास कळविण्यात येते की, आपले मुळ शैक्षणिक व इतर आवश्यक अभिलेखे तसेच जाहिरातीमधील नमूद आवश्यक कागदपत्रे त्यांच्या एका साक्षांकित प्रतीसह पडताळणीसाठी दिनांक. 15/07/2025 रोजी वेळेवर उपस्थित रहावे. कागदपत्र पडताळणीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास गैरहजर राहणा-या उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीसाठी नंतर विचार केला जाणार नाही. सदर उमेदवारास निवड प्रक्रियेसंबंधात कोणाताही दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

**सोबत :- कागदपत्र पडताळणीसाठी घेवून यावयाच्या कागदपत्राची यादी**

(सचिन इगे)
**सदस्य सचिव,जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
जिल्हा परिषद धाराशिव.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:**

1.मा.जिल्हाधिकारी,धाराशिव तथा जिल्हा निवड समिती धाराशिव यांना माहितीस्तव सविनय सादर.

2.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांना माहितीस्तव सविनय सादर.

-स्वा-
**सदस्य सचिव,जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
जिल्हा परिषद धाराशिव

**जिल्हा परिषद धाराशिव सरळसेवा पदभरती-२०२३**
**या कार्यालयाने प्रसिध्द करण्यात आलेल्या वरिष्ठ सहाय्यक (लेखा) पदासाठी उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीस घेऊन यावयाचे कागदपत्रांची यादी**

| अ.क्र | कागदपत्रे/प्रमाणपत्र |
|---|---|
| १. | संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट आऊट तसेच परीक्षा फी जमा केल्याचा पुरावा |
| २. | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| ३. | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ४. | वयाचा पुरावा |
| ५. | जन्माचा पुरावा |
| ६. | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याचा पुरावा |
| ७. | राखीव प्रवर्गातुन निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र,जातपडताळणी प्रमाणपत्र |
| ८. | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अर्ज सादर करण्याच्या दिनांकास वैध असणारे) |
| ९. | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| १०. | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| ११. | खेळाडुसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १२. | अनाथ आरक्षणकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १३. | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १४. | महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांमधील मराठी भाषीक उमेदवारांना सक्षम प्राधिका-याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १५. | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १६. | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १७. | लहान कंटुंबाचे प्रतिज्ञापत्र |
| १८. | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १९. | **MS-CIT** अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| २०. | टंकलेखन प्रमाणपत्र |
| २१. | लघुलेखन प्रमाणपत्र |
| २२. | अनुभव प्रमाणपत्र |
| २३. | नावातील बदलाबाबत प्रमाणपत्र/शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा |
| २४. | छायाचित्र ओळख पुरावा (आधारकार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड,राज्य निवडणुक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, पारपत्र, राष्ट्रीयकृत बॅकेचे खातेपुस्तक) |

(सचिन इगे)
**सदस्य सचिव,जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
जिल्हा परिषद धाराशिव